ज्ञा न प्र बो धि नी



# त्रैमासिक वृत्त

सौर चैत्र ते ज्येष्ठ १९३७
(दि. २२ मार्च ते २१ जून २०१५) या काळातील उपक्रमांचे वृत्त

## स्त्री शक्ती प्रबोधन, ग्रामीण

### बचतगट मेळावा

सौर चैत्र २८ (१८ एप्रिल) रोजी शिवापूर जवळ शिवराय मंगल कार्यालयात बचत गटाच्या कामाचा द्विदशक पूर्ती मेळावा झाला. साधारण ८१ गावातून ३५०० पेक्षा जास्त महिला व १०० पुरुष आले होते. महाराष्ट्रातील बचत गट चळवळीच्या प्रणेत्या डॉ. सुधाताई कोठारी व मेळघाट मध्ये काम करणाऱ्या डॉ. निरुपमाताई देशपांडे या दोन प्रमुख पाहुण्या म्हणून आल्या होत्या. वीस वर्षांच्या कामाचा आढावा घेणारी तयार केलेली चित्रफीत दाखवण्यात आली आणि गाव पातळीवरच्या कार्यकर्त्यांचा सन्मान चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. मेळाव्याचे सर्व नियोजन स्थानिक महिलांनी केले होते. मंडपाला खूप खर्च येईल म्हणून कार्यालय विनाशुल्क वापरण्यास मिळवले, जेवणासाठी घरचा तांदूळ, कांदे, बटाटे गटागटातून गोळा केले. अगदी घरच्या पाहुणचारासारखा सगळ्यांचा सहभाग होता.



स्त्री शक्ती प्रबोधन, ग्रामीण - द्विदशकपूर्ती मेळावा



कै. काकासाहेब सुपनेकर स्मृति प्रतिष्ठान – महिला उद्योजिका पुरस्कार

मेळाव्यामध्ये कै. काकासाहेब सुपनेकर स्मृति प्रतिष्ठान ह्यांच्यातर्फे प्रतिवर्षी दिला जाणारा महिला उद्योजिका पुरस्कार यावर्षी ग्रामीण भागातील उल्लेखनीय व्यवसाय करणाऱ्या सौ. सुवर्णा निघुट, सौ. प्रेमल चौगुले यांना देण्यात आला व श्रीमती लीलाताई डिंबळे व सौ. सुरेखा सोनावणे यांना उत्तेजनार्थ पुरस्कार देण्यात आला. कै. काकासाहेब सुपनेकर यांचे नातू श्री. हेमंत खिरे व नातसून सौ. वृषाली हेमंत खिरे हे दोघेही त्यावेळी उपस्थित होते.

## सन २०१४-१५ चा शालांत परीक्षेचा निर्णय

### ज्ञानप्रबोधिनी प्रशाला, पुणे

- प्रथम क्रमांक देविका गुमास्ते ९७%
- आलोक साठे संस्कृत मध्ये १००/१०० गुण
- ९०% पेक्षा अधिक गुण – ४१ विद्यार्थी
- ८० ते ८९% गुण – ३० विद्यार्थी

### ग्राम प्रबोधिनी, साळुंब्रे

- प्रथम क्रमांक ऋतुजा संतोष विधाटे ९०.२०%
- विशेष श्रेणी १६ विद्यार्थी
- प्रथम श्रेणी १५ विद्यार्थी

### ज्ञान प्रबोधिनी, हरळी

- ऋषिकेश बेंद्रे ९५% मिळवून पहिला
- अरविंद पाटील ९४.४% मिळवून दुसरा

### ज्ञान प्रबोधिनी, सोलापूर

- ९०% पेक्षा जास्त गुण मिळविणारे विद्यार्थी : २६
- शाळेतून प्रथम ९७.४०% तीन विद्यार्थी

१) वैष्णवी औरंगाबादकर २) मेघःश्याम केत ३) नीरज जाधवर

### नवनगर विद्यालय, निगडी

- माध्यमिक मराठी : आदित्य आसबे ९६.६०%
- इंग्रजी माध्यमिक : नीरज बोराडे ९६.४०%
- क्रीडाकुल : ऐश्वर्या शिंदे ८४.६०%
- गुरुकुल : सुरभी भोते ९५.४०%
- ९०% पेक्षा अधिक गुण ५८ विद्यार्थी
- ७५ ते ८९% अधिक गुण मिळवणारे ९८ विद्यार्थी

## युवक विभाग, पुणे

**दुष्काळ निवारण :** सौर चैत्र १५ व १६ (२५ व २६ एप्रिल) रोजी पळसगाणे आणि गेळगाणे येथे श्रमकार्य करण्यासाठी चंद्रशेखर आझाद दल, शहीद भगतसिंह दल, नेताजी सुभाषचंद्र बोस दल व नेतृत्व संवर्धन केंद्रातील एकूण मिळून अठरा युवक आणि बाबासाहेब आंबेडकर दल, वर्गीस कुरियन दल(धायरी) या दोन दलांवरील ८ वी-९ वी तील ३५ युवक सहभागी झाले होते.युवक विभागातून एकूण ५० युवक वेल्ह्यामध्ये विहिरींचे काम करण्यासाठी गेले होते. एकूण दोन दिवसांच्या उपक्रमात पहिल्या दिवशी २८ युवक हे पाच गटांमध्ये विभागून वेल्ह्यातील २०-२५ गावांमध्ये सर्वेक्षणासाठी गेले होते. गावांमधील परिस्थिती, इतर समस्या यांची माहिती सर्वेक्षणातून घेतली. नवीन गावांचे सर्वेक्षणसुद्धा या वेळी झाले. दुसऱ्या दिवशी २७ युवकांचा गट घेवंडे येथे आणि २३ युवकांचा गट गेळगाणे येथे श्रमकार्यासाठी गेला होता.



युवक विभाग श्रमकार्य

## ग्रामविकसन

**पाणी टंचाई निवारण कार्यक्रम :** खोपडेवाडी (ता. वेल्हे) येथे जुन्या सरकारी विहिरीचे खोलीकरण व रुंदीकरणाचे दुसऱ्या टप्प्यातील काम नुकतेच पूर्ण झाले आहे. हे काम पर्सिस्टंट फौंडेशनच्या अर्थसहाय्यातून गेल्या वर्षीपासून चालू आहे. विहिरीत उतरून यारीच्या भांड्यात दगड-माती भरण्याचे काम ग्रामस्थांनी श्रमदानाने केले, यंदा एकूण ३५१ मनुष्यदिवस रु. ७५ हजार मूल्यांकनाचे श्रमदान झाले. याव्यतिरिक्त ग्रामस्थांनी घरटी १५०० रुपये याप्रमाणे ४५ हजार रुपयांची लोकवर्गणी गोळा केली होती. या कामातून विहिरीची पाणीसाठवण क्षमता ३० हजार लिटर वरून ९ लाख लिटर इतकी झाली आहे.



खोपडे वस्ती : जुन्या सरकारी विहिरीचे खोलीकरण

**पाणलोट क्षेत्रविकास कार्यक्रम :** वेल्हे तालुक्यातील पासली खोऱ्यातील गेळगाणे या गावात शेतबांध दुरुस्ती व जमीन सपाटीकरणाचे लोकसहभागातून चालू असलेले काम पूर्ण झाले. या उपक्रमात आत्तापर्यंत खोपडेवाडी, गेळगाणे, पळसगाणे व कोंढाळकर वस्ती या तीन गावातील एकूण ७२ शेतकऱ्यांच्या शेतावरील काम पूर्ण झाले असून या सर्व कामात शेतकऱ्यांनी स्वतःच्या ५०% लोकवर्गणीतून हे काम करून घेतले ! या कामासाठी अडीच लक्ष रुपयांची लोकवर्गणी उभी राहिली !!



लोकसहभागातून जमिन सपाटीकरण

## हार्दिक अभिनंदन

**MPSC २०१४ चा अंतिम निकाल :** सौर चैत्र १५ (५ एप्रिल) रोजी जाहीर झाला असून केंद्रातून ५२ विद्यार्थी ही परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. अधिकारी वर्ग श्रेणी १ मध्ये २२ जण व वर्ग श्रेणी २ मध्ये ३० जण उत्तीर्ण झाले आहेत. महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील वेगवेगळ्या पदासाठी त्यांची निवड झाली आहे.

## ग्रामीण : किशोरी विकास उपक्रम

उन्हाळ्याच्या सुट्टीत शिबिरे झाली. ७० गावांतून १४३३ मुलींपर्यंत यावर्षी पोचलो. सोळा जणींनी ही शिबिरे घेतली. त्या शिबिरे घेणाऱ्यांमध्ये कुसगावच्या चार, एम. एस्. डब्ल्यू. दोन, पुण्यातील दोन, खोपी दोन व इतर गावातील सहा जणी होत्या. 'प्रबोधिनीत यायचे' हे गीत शिकणे, विज्ञान प्रयोग, दोन खेळ (एक बैठा, एक मैदानी) असे याचे स्वरूप होते. साधारण २०० युवती व १२३३ किशोरी यामध्ये सहभागी झाल्या होत्या.

वेल्हे येथे पंधरा मुलींसाठी वसतिगृह सौर ज्येष्ठ २५ (१५ जून)पासून सुरू झाले. इ. ५वी ते १०वी पर्यंतच्या मुली, पाच गावातून वेल्हे येथे शिकायला आल्या आहेत.




किशोरी विकास उपक्रम - उन्हाळी सुट्टी शिबिरे

## नागरी वस्ती अभ्यासगट



नागरी वस्ती अभ्यासगट - किशोरी मेळावा

**किशोरी मेळावा :** सौर ज्येष्ठ ३ (२४ मे) रोजी प्रबोधिनी वास्तूमध्ये किशोरी व युवतींचा मेळावा झाला. त्यामध्ये ५० किशोरी सहभागी होत्या. गंमत खेळ, विविध कलांचे प्रशिक्षण व आरोग्य सत्राचे ही नियोजन केले होते.

**शिक्षण प्रेरणा शिबिर :** सौर ज्येष्ठ १६ ते १९ (६ ते ९ जून) या कालावधीत किशोरींचे निवासी शिक्षण प्रेरणा शिबिर झाले. त्यामध्ये २४ मुली सहभागी झाल्या होत्या. वाचन व श्रवण कौशल्य, वादविवाद, गटचर्चा, प्रश्नमंजूषा या सत्रांमधून मुलींनी त्यांचे विचार व अनुभव व्यक्त केले.



नागरी वस्ती अभ्यासगट - शिक्षण प्रेरणा शिबिर

## स्त्री-पुरुष संपूरकता कार्यशाळा

'स्त्री-पुरुष संपूरकता' या विषयावर सौर चैत्र २१ (११ एप्रिल) रोजी कार्यशाळा झाली. यामध्ये अनघाताई लवळेकर यांनी ''संपूरकते'' विषयीच्या कल्पना स्पष्ट केल्या. खेळ व नाट्य प्रसंगातून घरामध्ये साधायची संपूरकता संवादिनी सदस्यांनी सादर केली. 'महाराष्ट्र शासन व केंद्र शासनाच्या स्त्रियांविषयीच्या योजना' या विषयावर सविताताई कुलकर्णी यांचे व्याख्यान झाले. दूरदर्शन वाहिनी 'साम'चे संपादक श्री. संजय आवटे यांनी स्त्री-पुरुषांची बदलती कामे, भूमिका व समन्वय यावर त्यांच्या दीर्घ अनुभवातून मांडणी केली या कार्यशाळेला ३५ स्त्री व सहा पुरुष सदस्य उपस्थित होते.

## उन्हाळ्याच्या सुट्टीतील शिबिरे

शैक्षणिक उपक्रम संशोधिकेतर्फे उन्हाळ्याच्या सुट्टीत इ. ५वी ते ८वीच्या विद्यार्थ्यांसाठी दि. १७ एप्रिल ते ६ मे या कालावधीत आठ शिबिरे झाली. प्रज्ञा विकास, विज्ञान, प्रज्ञा शोध-राष्ट्रीय पातळी परीक्षा, 'चला कल्पक बनू या', स्वयं अध्ययन कौशल्य, फिल्म मेकिंग - छोट्या फिल्म तयार करणे इ. विषयांवर ही शिबिरे झाली. इचलकरंजी येथील २८ विद्यार्थ्यांसाठी ज्ञान प्रबोधिनी पुणे येथे तीन दिवसांचे निवासी शिबिर झाले. पुणे शहर व वस्ती विभागातील एकूण ३३२ विद्यार्थी यात सहभागी झाले होते.



शैक्षणिक उपक्रम संशोधिका - विज्ञान शिबिर



इचलकरंजी येथील विद्यार्थ्यांसाठी निवासी शिबिर



छोट्या फिल्म तयार करण्याचे प्रशिक्षण

शिक्षक प्रशिक्षण केंद्रातर्फे याच कालावधीत पुण्यात तीन व सांगोला (सोलापूर) येथे शिक्षकांसाठी प्रशिक्षण झाले. प्रभावशाली अध्यापनासाठी, अध्यापकाची परिणामकारकता स्वयं अध्ययन कौशल्ये, वाचन कौशल्ये या विषयावर कार्यशाळा झाला. यात एकूण १३७ शिक्षक सहभाग झाले होते.

## अंबाजोगाई विस्तार केंद्र

उन्हाळ्याच्या सुट्टीमध्ये शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. शिबिर घेणारा गट हा विद्याव्रत झालेला व यापूर्वी शालेय वयोगटात शिबिरात सहभागी झालेला होता. विद्याव्रत संस्कार शिबिर तसेच शेपवाडी येथे दोन दिवसांचे निवासी शिबिर झाले. यामध्ये ४५ विद्यार्थी सहभागी झाले होते. अशी तीन शिबिरे झाली.


• **प्रकाशन**

सौर अग्रहायण ३०, शके १९३७

दि. २१ डिसेंबर २०१५

पुस्त-डाक

(खासगी वितरणासाठी)



• **प्रेषक**

ज्ञान प्रबोधिनी

५१०, सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

☎ : २४२०७०००, २४२०७००१